# आदिवासी विकासातील योगदान : आश्रमशाळा वाकडी-शांतिवन ( ता. पनवेल जि. रायगड )

सौ. विजयश्री राजेंद्र पाटील
एम्. फील टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.



***प्रस्तावना :***

जनगणना 2011 नुसार रायगड जिल्हयातील पनवेल तालुक्याची लोकसंख्या सुमारे 7,50,236 आहे. तर पनवेलमधील ठाकूर आणि कातकरी या आदिवासी जमातींची लोकसंख्या सुमारे 48,162 आहे. प्रामुख्याने हा आदिवासी समाज पनवेल तालुक्याच्या आजुबाजुला असलेल्या दुर्गम भागात वास्तव्य करून राहतो. आज एकविसाव्या शतकातही हा आदिवासी समाज आपल्या परंपरा जपत परंपरागत व्यवसाय करीत असलेले दिसून येतात.

पनवेल तालुक्यात सुमारे 164 आदिवासी वाडया आहेत . या सर्व वाडया डोंगराळ आणि दुर्गम भागात आहेत त्यामुळे तेथे जाण्यासाठी धड कच्चा रस्ताही नसलेला दिसून येतो. पनवेलपासून सुमारे आठ किमी वर असणा-या शांतिवनच्या निसर्गरम्य परिसरात वाकडी गावात वसलेली 'श्री अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे अनुदानित आदिवासी आश्रमशाळा' आदिवासींच्या शैक्षणिक विकासात मोलाचे कार्य करीत आहे.

कुष्ठरूग्णांचा शोध घेऊन त्यांच्यावर उपचार करून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी बाबा आमटे यांचा आदर्श डोळयापुढे ठेवून थोर स्वातंत्र्यसेनानी अनंत वासुदेव सहस्त्रबुद्धे यांनी 'कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन ता. पनवेल जि. रायगड' या संस्थेची स्थापना सन 1954 साली केली. शांतिवनचे शिल्पकार स्वर्गिय गोविंदराव शिंदे आणि त्यांचे सहकारी जेव्हा पनवेल तालुक्यातील आजुबाजुच्या आदिवासी वाडयापाडयांवर कुष्ठरूग्णांचा शोध घेत फिरत असत तेव्हा त्यांना शिक्षणापासून वंचित असलेली आदिवासी मुले फिरताना दिसत असत. या आदिवासी समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही याची जाणिव शांतिवनच्या कार्यकर्त्यांना झाली आणि अथक परिश्रमांनी 15 ऑक्टोबर 1994 रोजी 'श्री अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे अनुदानित आदिवासी आश्रमशाळा' स्थापन झाली. सुरूवातीला छोटयाशा झोपडीत शाळा सुरू झाली पण आज मात्र सर्व प्रकारच्या सुखसुविधांनी युक्त अशी ही आश्रमशाळा विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधण्याचे कार्य करीत आहे.

आदिवासी विकास विभाग 'एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पेण जि. रायगड' यांच्या अधिनस्त असलेल्या या आश्रमशाळेत आज पनवेल तालुक्यातील आजुबाजूच्या सुमारे चाळीस आदिवासी वाडयांतील इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचे 500 विद्यार्थी निवासी राहून शिक्षण घेत आहेत.

कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन संस्थेच्या उपाध्यक्षा मा. रक्षा मेहता आणि संस्थेच्या इतर पदाधिका-यांच्या मदतीने शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना सर्व भौतिक सुविधा मिळाव्यात आणि त्यांची सर्वांगिण प्रगती व्हावी यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करीत असतात.

अन्न वस्त्र निवारा आरोग्य आणि शिक्षण या माणसाच्या मुलभूत गरजा आहेत. या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या निवासाची उत्तम सोय आश्रमशाळेत आहे. यासाठी मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र्य निवासाची सोय आहे. आदिवासी वाडयापाडयांवर परिपूर्ण आहार न मिळाल्यामुळे मुले कुपोषित आढळतात. त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येते आणि पर्यायाने मुलांच्या जीवनमानावर त्याचा परिणाम होतो. मात्र या आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेतली जाते. विद्यार्थ्यांना दररोज एक ग्लास दूध, फलाहार, वरण,भात, भाजी, चपाती असे परिपूर्ण आणि शाकाहारी जेवण दोन वेळा आणि नाश्ता दोन वेळा दिला जातो. दर आठवडयाला मुलांची वैद्यकिय तपासणी करून औषधोपचार केला जातो. जीवनावश्यक सर्व बाबी तसेच सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य शाळेकडून विद्यार्थ्यांना पुरविले जाते. फक्त पुस्तकी ज्ञान देणे येवढाच हेतू या आश्रमशाळेचा नाही तर प्रामुख्याने मुली स्वतःच्या पायावर उभ्या राहतील या दृष्टीने शिवणवर्ग, विणकाम,मेंदीकोर्स यासारखे प्रशिक्षण मुलींना दिले जाते. आज दोन दशके अविरतपणे ही अनुदानित आश्रमशाळा ज्ञानदानाचे कार्य करत आहे. यापूर्वी आदिवासी मुले मोलमजुरी किंवा प्राथमिक शिक्षण घेऊन घरी बसत असत मात्र ही आश्रमशाळा विद्यार्थ्यांना दहावी पर्यंत शिक्षण देते आणि उच्चशिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळवून देण्यासाठी मदतही करते. पनवेल तालुक्यातील ही आश्रमशाळा या आदिवासींसाठी करत असलेल्या शैक्षणिक कार्यामुळे अनेक आदिवासी विद्यार्थी आज उच्चशिक्षण घेत असलेले दिसून येतात. परंपरांच्या आणि गैरसमजूतींच्या जुनाट कक्षा ओलांडून उच्चशिक्षणासाठी धडपड करताना दिसतात. याचा परिणाम म्हणजे आज या आश्रमशाळेतील अनेक विद्यार्थी उच्चशिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहिलेले दिसून येतात.

दोन दशकांपूर्वी या आदिवासी भागात मुलगी वयात आली की तिला शाळेतून काढून तिचे लगेच लग्न लावून दिले जात असे. त्यामुळे बालमृत्यू, कुपोषण, स्त्रियांच्या शैक्षणिक दर्जाची घसरण, स्त्रियांच्या मृत्यूचे वाढते प्रमाण यासारख्या भयंकर समस्या होत्या. मात्र या आश्रमशाळेने वेळोवेळी पालकसभा, पालकभेटी आणि पालकमेळावे आयोजित करून स्त्रिशिक्षणाचे महत्त्व आदिवासी समाजाला सांगितले. मुलींमध्ये, पालकांमध्ये शिक्षणाबद्दल आस्था

वाढविली. त्यामुळे लहान वयातील मुलींच्या लग्नाचे प्रमाण मोठया प्रमाणात कमी झालेले दिसून येते. मुलींची शाळेतून गळती न होता मुली माध्यमिक शिक्षण पूर्ण करून पुढे पनवेल येथे वसतिगृहात राहून उच्च शिक्षण घेताना दिसतात.

ही अनुदानित आश्रमशाळा कुष्ठरोग निवारण संस्था शांतिवनचा एक भाग आहे. या संस्थेतील बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्रामार्फत अनेक आदिवासी वाडया दत्तक घेऊन त्या वाडयांचा सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. आंबेवाडी, टावरवाडी, गाढेश्वर, वांगणी भेकरा यासारख्या आदिवासी वाडयांना दत्तक घेऊन तेथे पिण्याच्या पाण्याची सोय आणि शौचालये बांधून आदिवासींना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. या वाडयांतील आदिवासी महिलांना शिवणवर्ग प्रशिक्षण, गोधडया शिवणे, अगरबत्ती आणि मेणबत्ती बनविणे यासारख्या लघुदयोगाचे प्रशिक्षण देऊन स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत करत आहे. कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन आणि श्री अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे अनुदानित आश्रमशाळेच्या प्रयत्नांमुळे या विभागातील आदिवासींचे राहणीमान उंचावण्यास मदत होत असताना दिसते.

संदर्भ :

1. वार्षिक अहवाल – कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन, ता. पनवेल
2. वार्षिक अहवाल – अनुदानित आश्रमशाळा वाकडी शांतिवन, ता. पनवेल